दि.१२/०१/२०२३

## प्रसिध्दी पत्रक

आरोपी लोकसेवक रामकृष्ण बारकु निकम, वय 53 वर्षे, पद- ग्रामविकास अधिकारी, ने. ग्रामपंचायत कार्यालय साजापुर जि.औरंगाबाद यांनी तक्रारदार यांच्याकडुन लाचेची रोख रुपये 5000/- व घराची टॅक्स पावती करिता रुपये 4000/- लाचेची रक्कम स्विकारल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबादच्या जाळ्यात.

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | :- | पोलीस ठाणे एमआयडीसी वाळुज औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |
| आ.लो.से. यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | रामकृष्ण बारकु निकम, वय 53 वर्षे, पद- ग्रामविकास अधिकारी, ने. ग्रामपंचायत कार्यालय साजापुर जि.औरंगाबाद रा. फस्ट अ‍ॅव्हेन्यु सोसायटी प्लॅट नं.01 जालाननगर औरंगाबाद. (वर्ग-3) |
| लाच मागणी रक्कम | :- | 5000/- रुपये व घराची टॅक्स पावतीचे 4000/-रुपये. |
| लाच स्विकृती रक्कम | :- | 5000/- रुपये व घराची टॅक्स पावतीचे 4000/- रुपये असे एकुण 9000/- |
| तपास अधिकारी | :- | श्रीमती रेश्मा सौदागर, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद. |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांचे घराचे नमुना नं. 08(अ) चा उतारा देण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांचे घराचे नमुना नं. 08(अ) चा उतारा देण्यासाठी आरोपी लोकसेवक श्री. निकम यांनी 5000/- रुपये व घराची टॅक्स पावतीचे 4000/- रुपये असे एकुण 9000/- लाचेची मागणी करित असल्याने, तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली.<br>तक्रारदार यांचे तक्रारीवरुन केलेल्या पडताळणी दरम्यान आ.लो.से.निकम यांनी 5000/- रुपये व घराची टॅक्स पावतीचे 4000/- रुपये असे एकुण 9000/- रुपये लाचेची मागणी करुन पंच साक्षीदारांसमक्ष स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दि. 12/01/2023 रोजी सापळा आयोजीत केला असता, आ.लो.से. निकम यांनी 5000/- रुपये व घराची टॅक्स पावतीचे 4000/- रुपये असे एकुण 9000/- रुपये पंच साक्षीदारा समक्ष लाचेची रक्कम साजापुर ग्रामपंचायत कार्यालय येथे स्विकारल्यानंतर लाचेच्या रक्कमेसह त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पो.ठाणे एमआयडीसी वाळुज औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मा.संदिप आटोळे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रेश्मा सौदागर यांनी केली आहे. त्यांना सदर कारवाई कामी पो. अं. रविंद्र काळे, राजेंद्र जोशी, विनोद आघाव, दत्तात्रय होरकटे यांनी मदत केली आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.


संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद
ई- मेल :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 9923023361 अपर पोलीस अधीक्षक :- 8788644994
पोलीस उप अधीक्षक :- 9356115189


12.01.23

(मारुती शंकर पंडित)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद.